Maharashtra Times, Pune April 27, 2015 Pp. 3

# आपले दु:ख स्वीकारून जीवन जगा : नारळीकर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अवकाशातील ग्रह आणि ताऱ्यांची गुपिते....विश्वाच्या निर्मितीचा मागोवा आणि गणितातल्या विविध गमतीजमतींचे शेअरिंग....अशा दिलखुलास वातावरणात ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर आणि गणितज्ज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांच्या जीवनाची 'आनंदयात्रा' रविवारी उलगडली.

एकाकी व्यक्तींसाठी कार्यरत असलेल्या आनंदयात्रा या स्वमदत गटातर्फे डॉ. नारळीकर दाम्पत्याशी संवादाचे आयोजन करण्यात आले होते. गटाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. हेमंत देवस्थळी आणि मृणालिनी काळे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

'आज शास्त्रज्ञ लावत असलेले शोध पूर्वीच लागले असल्याचे बोलले जाते. त्याचे उल्लेख पुराणकथांमध्ये असल्याचेही सांगितले जाते. परंतु, त्याचा केवळ उल्लेख असून चालणार नाही, तर त्यासाठी ठोस पुरावे असणे आवश्यक आहे,' असे डॉ. जयंत नारळीकर यांनी सांगितले.

'घराला प्राधान्य दिल्याने करिअरकडे फारसे लक्ष देऊ शकले नाही,' असे सांगून मंगला नारळीकर म्हणाल्या, 'गणितात फारसे संशोधन करता आले नाही. परंतु, मला गणित शिकवायला आवडते. जगामध्ये सुखी असे कोणीच नसते. एकाकी जीवन हा त्याचाच एक भाग आहे. दु:ख माझ्याच वाट्याला का, असे म्हणण्यापेक्षा आहे ते स्वीकारून सकारात्मक काम करता येईल, हे पाहून जीवनाचे गणित सोडवावे,' असेही त्यांनी सांगितले.